# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

डोमिनिका या देशानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशातील सर्वात मोठा राष्ट्रीय पुरस्कार घोषीत केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोविड काळात डोमिनिका देशाला केलेली मदत आणि भारत– डोमिनिका या देशांतील संबंध दृढ करण्यासाठी घेतलेला पुढाकार यासाठी मोदी यांना पुरस्कार घोषीत केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. समाजमाध्यमावरील संदेशात पंतप्रधान मोदी यांनी नेहरुंना आदरांजली वाहिली आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी जिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी पंडीत नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. यावेळी कर्मचारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

विधानसभा निवडणुकीत उमेदवारांच्या प्रचारासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आज जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभा होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणेसह सर्वच व्यवस्थेवर प्रशासनाची करडी नजर आहे.

ज्येष्ठ भाजपनेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दुपारी दोन वाजता छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी चिकलठाणा इथं सभा होणार आहे. त्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या नवी मुंबई आणि मुंबईत सभा होणार आहेत. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी थोड्याच वेळात नंदुरबार इथं आणि त्यानंतर तीन वाजता नांदेडमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये सायंकाळी सहा वाजता सभा होणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यातील माजी खासदार हरिश्चंद्र देवराम चव्हाण यांचं आज सकाळी नाशिक इथं निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. पेठ-सुरगाणा या आदिवासी मतदारसंघातून ते सुरुवातीला अपक्ष म्हणून निवडून आले होते. त्यानंतर काँग्रेस पक्षाकडून एकदा खासदार तर भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर सलग दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. त्यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता सुरगाणा तालुक्यातील प्रतापगड इथं अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाच्या वतीनं आज सकाळी वॉक फॉर व्होटचं आयोजन केलं होतं. या अंतर्गत धाराशिव शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी यात मोठ्या संख्येनं सहभाग घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते या वॉकला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी धाराशिव जिल्ह्याचे पारंपारिक वाद्य असलेली आई तुळजाभवानीच्या संबळाच्या कडकडाटात आणि ढोलच्या निनादात वॉक फॉर वोटला सुरुवात झाली.

****

हिंगोली जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी आज दुचाकी रॅली काढण्यात आली. जिल्ह्यातलं मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा पुढं नेण्याचं आवाहन यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केलं. शिक्षणाधिकारी तथा 'स्वीप' समितीचे नोडल प्रशांत दिग्रसकर यांची यावेळी उपस्थिती होती.

****

परभणी जिल्ह्यात विधानसभेसाठी १०० टक्के मतदान करण्याच्या उद्देशानं जिल्हा प्रशासन आणि मतदान जनजागृती विभागाच्या वतीनं आज परभणी शहरात शनिवार बाजार ते राजगोपालाचारी उद्यान असं वोट फॉर रन या दौडचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यासह पोलीस तसंच निवडणूक अधिकाऱ्यांनी या दौडला हिरवा झेंडा दाखवला. तत्पूर्वी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी सर्वांना मतदानाची शपथ दिली.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सोलापूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

अमृतसर इथं गुरुनानक देव विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेत मुंबई विद्यापीठानं दोन कांस्य पदकं पटकावली आहेत. ६८ किलो वजन गटात सय्यद उमर आणि ८७ किलो वजन गटात राज घुले या विद्यार्थ्यांना कांस्य पदक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं. राष्ट्रीय पातळीवरील या स्पर्धेत देशभरातील १२७ विद्यापीठं सहभागी झाली होती.

****

जायकवाडी धरणात पाण्याची आवक कमी झाल्यानं धरणातून सुरू असलेला विसर्ग आज सकाळपासून पूर्णपणे थांबवण्यात आला आहे. धरण नियंत्रण कक्ष, पैठण यांनी याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली आहे.

****

नांदेड-भोकर रस्त्यावर आज सकाळी बारसगांव पाटीजवळ चारचाकी आणि दुचाकीच्या एकाचा मृत्यू तर तिघंजण जखमी झाले.

****

शेअरबाजाराला आज तेजीत सुरुवात झाली. सेन्सेक्स ११३ अंकांच्या वाढीसह ७७,८१३ वर उघडला, तर निफ्टी ४० अंकांच्या वाढीसह २३५९९ अंकांवर उघडला. गेल्या आठवड्यात शेअरबाजारात मोठी घसरण झाली होती.

****